छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९४३ । वर्ष २१ अंक १२।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३० अंक २)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



विविध प्रकल्पांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाच्या साह्याने
प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचवण्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी, पुणे संचलित

शैक्षणिक साधन केंद्र

MOOL (Movement of Open Online Learning)
मुक्त शिक्षणाची चळवळ

आम्हाला तुमचा अभिमान आहे.

शैक्षणिक साधन केंद्रातर्फे १५ ऑगस्ट रोजी सांकेतिक भाषेतील प्रतिज्ञेची चित्रफीत शासनाच्या दीक्षा पोर्टलवर प्रकाशित केली. त्यावरून सांकेतिक भाषेतील प्रतिज्ञेचे महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील कर्णबधिर शाळांतील ६० विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

YouTube

ERCJPP या YouTube चॅनेलचे सभासद व्हा !
चला आनंदी शिक्षणाची सुरुवात करूया

इ-अंक पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या लेखावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

- ✻ (स्क्रोल केल्यानंतर) 'अंतरंगा'चे पान येईल त्यानंतर 'संवादा'चे पान दिसेल.
- ✻ अंतरंगात अंकातील सर्व साहित्याची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी जो लेख तुम्ही वाचू इच्छिता त्या 'शीर्षका'ला क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या लेखावर जाऊन तो लेख वाचू शकाल.
- ✻ लेखाच्या शेवटी पान क्रमांकावर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या लेखाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.
- ✻ ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९४३। वर्ष २१ अंक १२
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकुणात ३५० वा अंक, वर्ष ३० अंक २)
प्रकाशन दिनांक – सौर १० भाद्रपद, शके १९४३/१ सप्टेंबर २०२१

अंतरंग

४. संवाद – शिल्पा कुलकर्णी
५. कथा... **झाले मोकळे आकाश...!*** – सचिन बेंडभर
८. कविता... **ऋतू हिरवा** – अर्चना देशपांडे-पोळ
९. माहितीपर... **गणपती पर्णसाज आणि पर्यावरण!*** – डॉ. कांचनगंगा गंधे
११. प्रेरणादायी... **अनंत अमुची ध्येयासक्ती...!** – सुप्रिया कुलकर्णी-खोत
१५. कलाकृती... **पॉप अप कार्ड*** – अपर्णा म्हात्रे
१६. ललित... **आपला हात जगन्नाथ!*** – एकनाथ आव्हाड
१८. विज्ञान प्रयोग... **फुलाचा रंग बदलता येतो का?**
१९. ललित... **नीलगाई दिसल्या नाहीत, पण...*** – किरण पुरंदरे
२३. लेखमाला...**तंत्रस्नेही अध्ययन कौशल्य** (लेखांक ३)* – प्रशांत दिवेकर
२५. **दिवाळी अंकाविषयी...**

मलपृष्ठाच्या आतील पद्य... **जीवन कणाकणाने घडे*** – प्रा. राम डिंबळे

याशिवाय: बुद्धीला खुराक (८), तुम्हाला माहीत आहे का?*(१४), निरीक्षणातून प्रयोगाकडे (२२), बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक*, हसा हसा..., प्रतिसादी वाचकवीर...(२६)

पानांखालील ओळी : काव्यपंक्ती - श्रमप्रतिष्ठा दिनानिमित्त **माहितीपर** - जागतिक शांतता दिनानिमित्त गांधी शांतता पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर/संस्था (गांधीजींच्या १२५ व्या जयंती निमित्त इ.स. १९९५ पासून भारत सरकारतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. येथे त्यातील निवडक व्यक्ती/संस्थांची नावे दिली आहेत. इ.स. २००६ ते २०१२ हा पुरस्कार दिला गेला नाही.)

अवश्य वाचा... पाहा... ऐका...

*** या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner **मोफत डाऊनलोड करून घ्या.**

मुखपृष्ठाविषयी : या महिन्यात आपल्या सर्वांचे लाडके गणपती बाप्पा आपल्या घरी येत आहेत. घरातील सर्वजण उत्साहाने त्यांच्या स्वागताची तयारी करत असतात. ही तयारी करणारे बालचमू आणि ते आनंदाने पाहाणारे गणपती बाप्पा या मुखपृष्ठासाठी साकारले आहेत.

– सायली कुलकर्णी

इ–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

ज्ञान प्रबोधिनीच्या पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या सभासद नोंदणीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!!
(अधिकाधिक जणांनी या संकेतस्थळावरूनच मासिकाची नोंदणी करावी, ज्यांना अगदीच अशक्य असेल अशांनी NEFT **चा वापर करावा.)**

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

मानद संपादक : शैलजा देशमुख

संपादक मंडळ
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन, मल्हार अरणकल्ले,
स्वाती ताडफळे

कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी

साहाय्यक कार्यकारी संपादक
अनादि ढवळे

मुखपृष्ठ : सायली कुलकर्णी

आतील चित्रे : चित्रांजली

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी
वार्षिक : ₹ २०० द्वैवार्षिक : ₹ ४००,
त्रैवार्षिक : ₹ ५५०
दशवार्षिक : ₹ १७००,
इ–अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००

या अंकाची किंमत : ₹ २०/–
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –
Account Name - Jnana Prabodhini
Bank Name - Bank Of India
Account No.- 051510110004917
Branch - Shanipar, Pune
IFSC Code - BKID0000515
ऑनलाइन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक देणगीदार – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • श्री. शशांक चांदोरकर, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे

संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

कोरोना आपत्तीच्या पार्श्वभूमीवर, इ. स. २०२० मध्ये होणाऱ्या टोकियो ऑलिम्पिक क्रीडास्पर्धा दिनांक २३ जुलै ते ८ ऑगस्ट २०२१ दरम्यान अखेर पार पडल्या. त्यामध्ये भारतीय खेळाडूंनी भालाफेक, वेटलिफ्टिंग, कुस्ती, मुष्टियुद्ध, हॉकी, बॅडमिंटन इ. खेळातून वैयक्तिक किंवा सांघिकरित्या केलेली 'चमकदार' कामगिरी आपण पाहिली. काही खेळाडूंचा प्रवास हा पदकापर्यंत घेऊन जाणारा झाला, तर काही जणांना पदकाने हुलकावणी दिलेली आपण बघितली. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर खेळाडू नीरज चोप्राने भालाफेकीत सुवर्णपदक मिळवून कळस चढवला. पदक घेताना भारतीय राष्ट्रगीताचे टोकियोमध्ये वाजलेले सूर ऐकून, प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून आला. या ऑलिम्पिकमध्ये महिला खेळाडूंचा लक्षणीय सहभाग होता. महिला हॉकी संघाने देखील लक्षवेधी कामगिरी करत चौथ्या क्रमांकाचे स्थान पटकावले. खरंतर, सगळ्याच खेळाडूंच्या व त्यांच्या प्रशिक्षकांच्या अथक प्रयत्नांना व जिद्दीला सलाम!!

ऑलिम्पिकमध्ये खेळण्याची संधी मिळणं हे प्रत्येक खेळाडूचं स्वप्न असतं. त्या स्वप्नाचा पाठपुरावा करण्यासाठी अनेकानेक अडथळ्यांच्या शर्यती पार करत, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठीची कौशल्ये काबीज करत ते खेळाडू इथपर्यंत येऊन पोहोचतात. या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये भारताकडून सहभागी झालेले बहुतेक खेळाडू हे भारताच्या ग्रामीण भागातील होते. मिराबाई चानू ही मणीपूर येथील एका दुर्गम खेड्यातून आली होती. तिने रजत पदकावर आपली मोहोर उमटवली; तर महिला हॉकी संघातील अनेक खेळाडू हरियाणातील खेड्यापाड्यातून आलेल्या होत्या. प्रतिकूल सामाजिक-आर्थिक परिस्थितीला शरण न जाता, त्याच्यावर मात करण्याची लढावू वृत्ती ही त्यांच्यापाशी उपजत दिसते. उत्तम प्रशिक्षणाचा परिसस्पर्श लाभल्यावर हे सर्व खेळाडू लक्षवेधी कामगिरी करतात. त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, विजिगिषू वृत्तीबरोबरच त्यांच्यातील खिलाडूवृत्तीचे दर्शनदेखील आपल्याला दिसते. अर्थात, सगळ्याच ग्रामीण भागातील खेळाडूंना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळतेच असे नाही. तरीही ते खेळाडू प्रयत्नांमध्ये कोणतीही कसूर सोडत नाहीत. तुमच्यापैकी किती जणांनी या ऑलिम्पिक स्पर्धा पाहिल्या? तुम्हाला कोणत्या स्पर्धा/प्रसंग विशेष भावले, संस्मरणीय वाटले ते आम्हाला देखील कळवा.

या ऑलिम्पिक क्रीडास्पर्धा बघून तुम्ही काही शिकणार की, इव्हेंट संपली की हे सर्व विसरून जाणार? अर्थात, प्रत्येकजण काही स्पर्धात्मक खेळाडू म्हणून घडणार नाही. (तरीही प्रत्येकाने मनसोक्त खेळलं पाहिजे, बरं का!) पण आपल्या बहुतेकांना मिळालेल्या अनुकूल परिस्थितीचा, कौटुंबिक प्रोत्साहनाचा, मुबलक साधनसामग्रीचा उपयोग-फायदा आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रात 'चमकदार' कामगिरी करण्यासाठी तरी करून घेऊ शकतो की नाही? प्रत्येकाच्या 'चमकदार कामगिरी'ची व्याख्या वेगवेगळी असेल; पण ती कामगिरी करण्यासाठी मात्र, हवी इच्छाशक्ती व नियोजनबद्ध प्रयत्न! आपलं आवडीचं क्षेत्र ठरवणं, त्यातील उच्चतम ध्येय ठरवणं व त्या ध्येयाच्या दिशेने पुढे जाण्यासाठी सुरुवातीला आपल्यासमोर छोटी-छोटी उद्दिष्ट्ये ठेवणं... मग ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणं, त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवणं... अशा दिशेने वाटचाल केल्यास, ध्येयाच्या दिशेने पुढे जात, उद्दिष्ट्यपूर्तीचा आनंद तुम्ही देखील मिळवू शकाल. खेळाडूंना त्यांच्या कौशल्यांची, क्षमतांची सर्वोच्च अभिव्यक्ती करताना पाहाणं, हे विलक्षण आनंद आणि प्रेरणा देणारं असतं! या क्रीडास्पर्धा आपापल्या आवडीच्या क्षेत्रात अशी 'लक्ष्यवेधी' कामगिरी करण्याची प्रेरणा, ऊर्जा मिळवण्यासाठी व ती टिकवण्यासाठी नक्कीच उपयोगी पडतील.

दोस्तांनो, 'छात्र प्रबोधन' कार्यालयात दिवाळी अंकाची लगबग सुरू झाली आहे. यंदाही तुमच्या भेटीला खास '३ दिवाळी विशेषांक' येत आहेत. त्याचे तपशील **पान क्र. २५ वर** वाचा. त्याबद्दलची माहिती तुमच्या मित्र-मैत्रिणी, भावंडांपर्यंत पोहोचवा, म्हणजे त्यांनादेखील सवलतीचा लाभ घेता येईल.

येणारा गणेशोत्सव सुरक्षितपणे, पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी तसेच गणरायाच्या साक्षीने तुमच्या आवडीच्या क्षेत्रात चमकदार कामगिरी करण्याचा संकल्प करण्यासाठी तुम्हाला खूप शुभेच्छा!

तुमची,
शिल्पाताई

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २००३ – वैक्लेव हॅवेल –चेकोस्लोव्हाकिया– येथील कम्युनिस्ट व्यवस्था उलथून टाकणाऱ्या वेलवेट क्रांतीमध्ये प्रमुख भूमिका बजावली.

वार्षिक देणगीदार – • **श्री. अमित बागाईतकर, पुणे** • **श्री. संजय प्रधान, सातारा** • **श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु** – कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.

झाले मोकळे आकाश...

– सचिन बेंडभर

सायंकाळची वेळ होती. ऊसाला पाणी सोडण्यासाठी शेतात गेलो होतो. भारनियमन असल्याने असेच वेळीअवेळी पाणी द्यावे लागे. मी विहिरीजवळ गेलो, तेव्हा सागर विहिरीच्या पायरीवर उभा होता. मला बघताच त्याने घाईघाईत विहिरीत उडी मारली. मी धावत पुढे गेलो. सागर पाण्यात गटांगळ्या खात होता. बघता-बघता तो विहिरीत बुडायला लागला. मी वेळ न दवडता लगेच सूर मारला. तळाला गेल्यावर चहूबाजूला सागरला पाहात होतो. तळाला त्याचा पांढरा शर्ट अस्पष्ट दिसत होता. जवळ जाऊन शर्ट हातात घेऊन त्याला घट्ट पकडले अन् वर खेचले. पोटात बरेच पाणी गेल्याने त्याला काठावर पालथे झोपवून पाणी बाहेर काढले. दहा मिनिटानंतर त्याने डोळे उघडले. तो सुखरूप असल्याचं पाहून मला हायसं वाटलं.

''मला का वाचवलं? मला जगायचं नाही. मला मरायचंय,'' असं म्हणून तो हमसाहमशी रडू लागला. मग मी कवेत घेत, त्याला धीर देत, शांत केलं. हळूहळू त्याला बोलतं केलं. दहावीला दोन विषयात नापास झाल्यामुळे त्यानं हे कृत्य केल्याचं समजलं. मनाने खचलेल्या सागरला घरच्या आणि शेजारच्या व्यक्तींनी लावलेल्या बोलाने आत्महत्येस प्रवृत्त केलं होतं. मी त्याला बरंच समजावलं; पण तो काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता.

मग मी त्याला म्हटलं, ''तुझ्या आयुष्याच्या शेवटचा एक दिवस मला दे. मग तुला वाटेल, ते तू कर! मी तुला अडवणार नाही.''

सागरने जरा विचार केला. एक दिवसानं काय बिघडतंय, असं मनात येऊन, त्यानं माझं म्हणणं मान्य केलं असेल कदाचित... मग शेतातली पाण्याची मोटर चालू न करताच त्याला घेऊन मी तडक घरी आलो.

दुसऱ्या दिवशी त्याला माझ्या गाडीत बसवून शिक्रापूरला आलो.

''कुठं जायचंय आपल्याला दादा?'' त्यानं मला विचारलं.

बळीराजा खपतो भूमीत, माती भिजते घामाने। अन्न मिळते जगाला, त्याच्या अविरत श्रमाने।।

वार्षिक देणगीदार – • श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे • श्री. आदित्य मोडक, डोंबिवली
• एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

''रांजणगाव गणपतीला जायचंय; पण जाता जाता माझ्या एका मित्राला भेटून जाऊ,'' मी त्याला म्हणालो.

आम्ही मित्राच्या घरी गेलो. त्याचे वडील सोफ्यावर पेपर वाचत बसले होते. आम्हाला पाहताच हस्तांदोलन करत त्यांनी आमचे स्वागत केले व बसायला सांगितले. सोफ्यावर बसताच सागरची नजर *हॉलमध्ये* लावलेल्या भिंतीवरील *पेंटींग्जवर* फिरू लागली.

''सागर, ही सर्व *पेंटींग्ज* धनूने काढलीत बरं का,'' मी म्हटलं.

पेंटींग्ज बघून सागरला खूप नवल वाटले. तो उठून एका *पेंटींगजवळ* गेला. हाताने त्याला स्पर्श केला.

''खरंच किती सुंदर आहे हे *पेंटींग,*'' तो म्हणाला.

''आवडले तुला?'' धनूच्या बाबांनी विचारलं.

''हो. खूप,'' सागर हसत म्हणाला. तेवढ्यात आतल्या खोलीमधून धनू बाहेर आला.

''सागर, हा माझा मित्र धनंजय साठे.''

मी धनूची ओळख करून देत म्हटलं.

सागर अवाक् होऊन धनूच्या जुळ्या हाताकडे बघत होता. त्याच्या चेहऱ्यावर शंकेची झालर होती.

मग मीच पुढे होऊन म्हणलो,

''सागर विशेष म्हणजे ही सर्व *पेंटिंग्ज* धनूनं पायानं काढलीत बरं का!''

सागरला धनूच्या *पेंटिंग्जविषयी* कौतुक वाटत होतेच; पण आता धनूविषयी असलेला आदर त्याच्या नजरेत जाणवला. नशिबावर खापर न फोडता, आवडती गोष्ट करण्यासाठी, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी धनूची चाललेली धडपड अन् धनूच्या अंगातली जिद्द त्याला खूप काही शिकवून गेली... चहापाणी घेतल्यावर आम्ही त्या दोघांचा निरोप घेतला.

रांजणगाव गणपतीचे दर्शन घेऊन आम्ही शिरूरला पोहोचलो. तहसिलदार कचेरीतील माझं काम आटोपून घरीच निघालो. तेवढ्यात माझी जुनी मैत्रीण कीर्ती भेटली. तिने आग्रह करून आम्हाला घरी चहासाठी नेलं. आमचा व्यवस्थित पाहुणचार केला. बोलता-बोलता मी तिला तिच्या छोट्या मुलीबद्दल विचारलं. मुलीचा विषय काढताच तिच्या डोळ्यांतून टचकन पाणी आलं. ती लगेच आत निघून गेली. मग तिच्या पतीने त्यांची लहानगी जग सोडून गेल्याचं सांगितलं. मी हळहळ व्यक्त केली; पण त्यांची मुलगी हे सुंदर जग पाहातेय, असं कीर्तीच्या पतीने सांगितलं. ते ऐकून मी चक्रावून गेलो.

मग त्यांनी मला समजावून सांगितलं, मागच्या महिन्यात तिची तब्येत फार खालावली. डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले; पण उपयोग होत नव्हता. मुलगी थोड्या दिवसांचीच सोबती आहे, असं कळल्यावर आम्ही तिचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. काळजावर दगड ठेवून सर्वांनी यास सहमती दिली. मग जनकल्याण नेत्रपेढीत 'लहान मुलीचे नेत्रदान होऊ शकते का', याची चौकशी केली. त्यांनी तशी परवानगी दिली. नेत्ररूपाने का होईना माझी मुलगी आज हे जग पाहतेय.''

बोलता-बोलता त्यांच्या डोळ्यांत पाणी दाटलं. आमच्या अंगावर सर्रकन काटा आला. निसर्गाने दिलेल्या अल्पायुष्याचेही सार्थक या चिमुरडीनं केलं. खिशामध्ये तिच्यासाठी आणलेली चॉकलेटं तशीच विरघळली. त्यांचा निरोप

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २००४ - कोरेटा स्कॉट किंग - अमेरिका- नागरी हक्क नेत्या, वांशिक समानतेसाठी कार्य

वार्षिक देणगीदार - • डॉ. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई • श्री. चैतन्य वझे, डोंबिवली
• सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद

घेतल्यावर घरी येईपर्यंत आम्ही दोघं एक शब्दही बोललो नाही.

दिवस मावळला होता. सागरच्या आयुष्यातला शेवटचा दिवस संपला होता. गाडीतून उतरल्यावर सागरने जवळ येऊन कडकडून मिठी मारली. 'मी चुकलो' म्हणत तो ओक्साबोक्शी रडू लागला. दिवसभरात घडलेल्या दोन घटनांमधून सागरला आयुष्याचा खरा अर्थ कळायला सुरुवात झाली.

सागरने त्याच्या अंगातील न्यूनगंड, भित्रेपणा, वाईट विचार यांना प्रयत्नपूर्वक दूर ठेवायचं ठरवलं!

आयुष्यातील शेवटच्या

दिवसाने त्याच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. आत्मविश्वास उंचावलेला सागर आता कोणत्याही संकटाने डगमगणार नव्हता. जिद्द, चिकाटी, धैर्य अंगी बाणवत संकटावर मात करण्याची प्रेरणा त्याला धनू आणि त्या चिमुरड्या मुलीकडून मिळाली होती. आत्महत्येचा विचार त्याने आता सोडून दिला होता. परीक्षेत नापास झालेला सागर खऱ्या अर्थाने आयुष्याच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सज्ज झाला होता.

– सचिन बेंडभर

पिंपळे जगताप, ता. शिरूर, जि. पुणे- ८

ऐका
कथा : प्रश्नार्थक
लेखक
डॉ. प्रदीप आवटे
वाचनस्वर : मृगा जोशी

पुणे नगर वाचन मंदिर, पुणेतर्फे आयोजित
मुलामुलींसाठी 'लेखन-अभिव्यक्ती स्पर्धा २०२१'

किशोर–कुमारवयीन (इ. ५ वी ते इ. १० वी) मुलामुलींसाठी स्पर्धेचे आयोजन! स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही!

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे तर्फे सुट्टीमध्ये 'ज्ञानयात्रा' या उपक्रमांतर्गत २५ व्हिडिओ क्लिप्स तयार करून त्या विद्यार्थ्यांसाठी खुल्या केल्या होत्या. **त्यातील निवडक ५ क्लिप्स तुम्ही QR Code स्कॅन करून किंवा यू ट्यूब लिंक्सद्वारे पाहा व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहा.**

1 2 3 4 5

यू ट्यूब लिंक्स
1. https://youtu.be/icTWEMwtwrI
2. https://youtu.be/grKG2fA6sfg
3. https://youtu.be/NO0ymHTZFig
4. https://youtu.be/yphzpi5Qu1E
5. https://youtu.be/c5uqoLXZkqM

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाचनप्रेमाविषयी तुमच्या शब्दांत माहिती लिहा.
२) 'दिनूचे बिल' या गोष्टीतून तुम्ही काय शिकलात?
३) सारसबागेतील सिद्धिविनायक मंदिराची तुम्हाला समजलेली वैशिष्ट्ये लिहा.
४) 'नवी दिशा' या गोष्टीसाठी योग्य अशी स्वतंत्र चार शीर्षके सुचवा.
५) थोरले बाजीराव पेशवे यांना 'अजिंक्य योद्धा' का म्हटले जाते?

वरील प्रश्न सोडवून उत्तरे दि. २५-९-२०२१ पर्यंत पाठवा.
सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व उल्लेखनीय अभिव्यक्ती लेखनास समारंभपूर्वक पारितोषिके देण्यात येतील.

प्रश्नांची उत्तरे तुम्ही सोबतच्या गुगल फॉर्म लिंकद्वारे QR Code स्कॅन करून पाठवू शकता किंवा उत्तरे स्वतंत्र कागदावर लिहून त्याचा फोटो गुगल फॉर्मला लावू शकता अथवा इ-मेलद्वारे पाठवू शकता किंवा खालील पत्त्यावर हस्ते/पोस्टाने/कुरियरने पाठवू शकता.

कागदावर तुमचे नाव, पत्ता, फोन क्र., इ-मेल, इयत्ता व 'लेखन अभिव्यक्ती स्पर्धा २०२१' असे लिहून मग प्रश्नांची उत्तरे लिहावीत.

पत्ता – अध्यक्ष, पुणे नगर वाचन मंदिर, १८१ लक्ष्मी रोड, बुधवार पेठ, पुणे २. इ–मेल – pnvm1848@gmail.com

श्रम म्हणजे साधना, त्याची वाटू नये लाज। श्रमानेच चढे, आयुष्यावर सुवर्णाचा साज।।

वार्षिक देणगीदार – • सौ. वैशाली पाटील–देवरे, शिरपूर, जि. धुळे • सौ. सीमा परांजपे, पुणे • श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर

ऋतू हिरवा

निळ्या नभातुन उतरुन आले
मोत्यांसम ते तृणात सजले
शुभ्र कांती अन् लोभसवाणे
दवबिंदूचे रूप देखणे।।

धुक्यात ओल्या भिजे पापणी
पान फुलांच्या ओठी गाणी
नभास भेटुन दवात भिजली
धरा साजरी हर्षे खुलली।।

सोनकोवळी प्रभा उमलली
आनंदाची लगबग झाली
नव्या उषेचे स्वागत करण्या
फुले पाखरे दंग जाहली।।

तरुवेलींवर कळ्या उमलल्या
नवीन आशा मनी जागल्या
निळ्या नभी भरारण्या मग
पंख पसरुनी सज्ज जाहल्या।।

रवी देखणा लोभसवाणा
रंग गंधुले उधळत आला
अवनीवरती चैतन्याचा
हरित कोवळा ऋतू उमलला।।

– **अर्चना देशपांडे–पोळ,** श्रीकृष्ण कॉलनी, देशमुख प्लॉट, बार्शी, जि. सोलापूर

बुद्धीला खुराक खाली काही कूटप्रश्न दिले आहेत. करा बरं विचार... आणि शोधा त्यांची उत्तरं!

१. पाय नाहीत, पण मी खूप लांब फिरतो.
साक्षर आहे, पण मी पंडित नाही.
तोंड नाही, पण मी स्पष्ट बोलतो!
मला ओळखील तो पंडित!

२. पर्वतावर रथ चालतो आहे,
पण सारथी आहे पृथ्वीवर
रथाचा वेग हवेलाही मागे टाकतोय,
पण रथ मात्र हलत नाही,
एक पाऊलभर, तर मी कोण?

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २००५ – डेसमंड टुटू – दक्षिण आफ्रिका – वर्णभेदाच्या विरोधात केलेल्या कार्यासाठी

वार्षिक देणगीदार – • डॉ. नीरज रायते, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे
• श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

गणपती पर्णसाज आणि पर्यावरण

– डॉ. कांचनगंगा गंधे

बुद्धीची देवता, देवादिगणांचा स्वामी, विघ्नांचा नियंत्रक म्हणजे श्री गणेश! शुभ कार्याच्या आरंभी श्री गणेशाला नमन करून कार्य सिद्धीस नेण्यासाठी प्रार्थना केली जाते.

भाद्रपदातल्या शुद्ध चतुर्थीला घरोघरी गणेशाच्या मूर्तीची पूजा केली जाते. श्री गणेशाची पार्थिव मूर्ती घरी आणून, तिची षोडषोपचारे पूजा करून, तिची प्राणप्रतिष्ठा करतात. नेहमीच्या पूजासाहित्याबरोबरच गणेशाला २१ पत्री वाहतात. या पत्रींमध्ये जमिनीलगत वाढणाऱ्या वनस्पतींपासून ते मोठ्या वृक्षांच्या पत्रींचा समावेश आहे.

एकवीस पत्री पवित्र तर आहेतच; पण शिवाय त्यांच्यात अनेक औषधी गुणधर्म आहेत. एवढंच नव्हे, तर पर्यावरणाच्या दृष्टीनेही या वनस्पती अतिशय मोलाच्या आहेत. सजीव सृष्टीतल्या प्रत्येक घटकाला मुख्यत्वेकरून पाणी आणि जमिनीची आवश्यकता असतेच! जमिनीची धूप थांबवली जाते, ती वनस्पतींमुळे, विशेषत: जमिनीवर पसरत वाढणाऱ्या वनस्पतींमुळे!

'दुर्वा' ही जमिनीलगत वाढणाऱ्या 'गवत' वर्गातली पसरत जाणारी वनस्पती!! गणेशाची सर्वात आवडती! दुर्वांची मुळे खूप चिवट असतात. त्यामुळे माती घट्ट पकडली जाते; त्यामुळे जमिनीची धूप होण्याचे प्रमाण खूप कमी होते. म्हणूनच ज्या जमिनीत वृक्षारोपण किंवा झाडांची रोपं लावायची असतील अशा ठिकाणी अगोदर दुर्वा लावल्यास जमीन चांगली घट्ट होते. शिवाय मातीत ओलावा टिकून राहतो. त्यामुळे मातीत राहणारे जीवजंतू, किडे, छोटे प्राणी, गांडूळ त्यांना ओलसरपणा मिळाल्यामुळे त्यांची निगा तर राखली जाते, शिवाय तिथल्या अन्नसाखळ्या, अन्नजाळ्यांमधली देवाण-घेवाण

होत राहते. पर्यायाने जमिनीखालची जैवविविधता टिकवण्यासाठी न कळतपणे दुर्वा उपयोगी पडतात.

जमिनीत मुरलेल्या पाण्याचे बाष्पीभवन उन्हामुळे होत असते. पाण्याची वाफ जमिनीबाहेर आल्यामुळे जमीन कोरडी होण्याचा धोका असतो. परंतु दुर्वांमुळे थोड्या प्रमाणात ही वाफ धरली जाते. राहिलेली पाण्याची वाफ हळूहळू वातावरणात पसरते. जमिनीच्या थोडी वर पसरत जाणाऱ्या, फिकट निळ्या रंगाची फुलं येणारी 'विष्णुक्रांता' वेलीची पानं पाण्याची वाफ थोड्या प्रमाणात शोषून घेते. त्याबरोबरच पावसाळ्यात उगवणाऱ्या, जमिनीपासून थोड्या उंच वाढणाऱ्या 'मरवा', 'तुळस', 'आघाडा', 'माका', 'डोरली' या वनस्पतीदेखील पाण्याची वाफ थोड्या प्रमाणात शोषून घेतात. या दिवसांत या वनस्पतींमध्ये औषधी

श्रम करून जगतो त्याला लेखू नका कमी। श्रमसाधनेतच दडली आहे यशाची हमी।।

वार्षिक देणगीदार – • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका
• डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. • डॉ. संजय गद्रे, धुळे

गुणधर्मांचे प्रमाण जास्त असते. 'धोत्रा', 'कण्हेर', 'रूई' (मांदार) ही झुडपं, कुंपणाचा आधार घेऊन वाढणारा जाईचा वेल; मध्यम उंचीची 'डाळींब', 'अगस्ती' (हादगा) आणि 'बोर' यांची झाडं, भरघोस पानांचा मधुमालतीचा वेल; दलदलीच्या जागेत वाढणारा सुवासिक 'केवडा', 'शमी', 'देवदार', 'पिंपळ' यांसारखे मोठे वृक्ष पर्यावरण शुद्ध राखण्यासाठी आणि पावसाच्या पाण्याने होणारी जमिनीची धूप थांबवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत.

सर्वच वनस्पती सूर्यप्रकाशात अन्न तयार करताना हवेतला कर्बद्वी प्राणित वायू शोषून घेतात आणि प्राणवायू बाहेर टाकतात; त्यामुळे शुद्ध हवेचा पुरवठा होतो. शिवाय उंच वाढणाऱ्या वृक्षांच्या पानांमुळे सूर्याच्या प्रखर किरणांची तीव्रता कमी होते. सूर्यकिरणं थेट जमिनीवर पडत नाहीत; यामुळे जमिनीतल्या पाण्याची वाफ होण्याचं प्रमाण देखील कमी होतं! पावसाच्या सरी जमिनीवर जोरदार आघात करू शकत नाहीत. जमिनीत मुरलेलं पावसाचं पाणी आणि तिथली पाण्याची पातळी बऱ्याच अंशी झाडांमुळे वाढते. जमिनीत ओलावा टिकून राहतो. जमिनीवर पडलेल्या मृत जैविक घटकांचे विघटन करणारे जीवाणू (बॅक्टेरिया), ॲक्टीनोमायसिट्स आणि काही बुरशींना ह्या ओलाव्याची आवश्यकता असते. या घटकांचं विघटन झाल्यामुळे जमीन सुपीक होते आणि जमिनीतही अन्नसाखळी अबाधित राखण्यास मदत होते. तरंगणारी धूळ आणि हवेतील घातक वायूही शोषून घेतात. डोरली, शमी, बोर, बेल यांसारख्या काटेरी वनस्पतींमार्फत पाणी कमी प्रमाणात बाहेर टाकलं जातं!

आघाडा, विष्णुक्रांता, माका, डोरली ह्या वनस्पती फक्त पावसाळ्यातच उगवतात. दुर्वा, तुळस, कण्हेर, मरवा, जाई, मधुमालती, डाळिंब घराच्या बागेत किंवा कुंड्यांमधून लावता येतील. बेल, पिंपळ, शमी, अर्जुनसादडा, देवदार असे वृक्ष मोठ्या *सोसायट्यांच्या* आवारात किंवा मोकळ्या जागेत लावता येतील. धोत्रा, रूई यांची झाडं वाढवताना फारशी काळजी घ्यावी लागत नाही; परंतु या दोन्ही झाडांची पानं, खोड, फुलं थोडी विषारी असल्यामुळे, झाडं वाढवताना आणि पानं तोडताना काळजी घ्यावी लागते. केवडा दलदलीच्या आणि दमट जागेत वाढत असल्यामुळे घराच्या आजूबाजूला लावता येणार नाही.

गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला वाहण्यात येणाऱ्या २१ पत्रींची झाडं वाढवणं, त्यांची निगा राखणं, त्यांचं संवर्धन करणं सहज शक्य आहे. या झाडांमध्ये विविधता आहे. 'वनस्पती वैविध्य' हा पर्यावरण शास्त्राचा आणि पर्यावरण शुद्ध राखण्याचा मुख्य पाया आहे! सृष्टीची आणि श्री गणेशाची हीच आजच्या काळानुरूप पूजा आहे.

– डॉ. कांचनगंगा गंधे

४१/६६७, लोकमान्यनगर, पुणे 411030

पाहा
गणेशोत्सवात गणपतीची पूजा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पत्रींचा परिचय करून देणारी चित्रफीत

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१३ - चंडीप्रसाद भट्ट - भारत - चिपको आंदोलनातील कार्यासाठी.

वार्षिक देणगीदार – • कै. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे • श्री. सागर सुराणा, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे

प्रेरणादायी

अनंत अमुची ध्येयासक्ती...

– सुप्रिया खोत

नुकत्याच टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये भारतीय महिला हॉकी संघाने ‘राणी रामपाल’च्या नेतृत्वाखाली अभिमानास्पद कामगिरी केली. त्याआधी राणीला २९ ऑगस्ट २०२० रोजी खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारी ती पहिली भारतीय महिला खेळाडू आहे. एकेक अडथळ्यांना पार करत इथपर्यंत राणीने जिद्दीने केलेला प्रवास थक्क करणारा आहे! जाणून घेऊ तिच्या जिद्दीची रोमहर्षक कहाणी!!

‘‘सर, आज मीही इथं खेळू का? मला एकदातरी खेळू द्या ना!’’ – ती काळी–सावळी कृश मुलगी आजही सर बलदेव सिंहांना विनवत होती...

‘‘अगं, एकदा बघ स्वत:कडे, किती अशक्त आहेस तू! तुला ते प्रशिक्षण झेपणार नाही बेटा!’’ बलदेवजींनी तिला ठरलेलं उत्तर दिलं.. आणि खरंच होतं ते! ..एका हातगाडी ओढणाऱ्या सामान्य मजुराची आणि एका कामवाल्या बाईची ही तिसरी मुलगी. दररोज ८० रुपयांत तिचे वडील घर चालवत. अठराविश्वे दारिद्र्य जिथे ठाण मांडून बसलेलं, तिथं हॉकी *अकॅडमीमध्ये* प्रवेश घेण्याचं स्वप्नं, तर दुरापास्तच होतं!

पण या सहा वर्षांच्या मुलीच्या जसं काही हे डोक्यात शिरतच नव्हतं ..नव्हे, अशा अशक्य परिस्थितीत तिच्याकडून चक्क एक अपराध घडला होता – स्वप्न पाहाण्याचा!! भारतीय हॉकी संघाची महिला कप्तान राणी रामपाल पुढे सांगते, ‘‘माझ्या जिद्दी स्वभावापुढे अखेर *कोच* सरांनी नमतं घेतलं आणि मी वयाच्या सहाव्या वर्षी हॉकी *अकॅडमी*, शाहबाद, हरयाणा इथं प्रवेश घेतला ... नव्हे, मी त्यांना मला *अकॅडमीत* घ्यायलाच लावलं!’’

पण कथा इथं संपत नाही ..याआधी सुद्धा या *अकॅडमीत* भारताच्या अनेक खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण मिळालं होतं, त्यांनी इथून बाहेर पडून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय सामने देखील गाजवले होते; पण फरक इतकाच होता की, ते सारे पुरुष होते!!

ही गोष्ट होती २००२ सालची. तिथं त्या लहानशा गावात मुलींनी काय करायचं असतं, याचे ठोकताळे एखाद्या जडशीळ खांबाप्रमाणे लोकांच्या डोक्यात अगदी घट्ट होते! ‘कुठून आणायची आपण हॉकी?’ ‘आणि *स्कर्ट* बिर्ट काही नाही घालायचे! आपल्या समाजातले लोक काय म्हणतील?’ ‘मुळात मुलींनी घरकामच करायचं असतं, तेच चांगलं जमतं त्यांना!’ या विचारांनी राणीच्या आईवडिलांना घेरलेलं होतं... ‘समाज काय म्हणेल?’ याचा एक दाट पडदा त्यांच्या डोळ्यांवर ओढलेला होता.

पण... ‘अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत

अन आशा!' या वचनाने पछाडलेली ती मुलगी आईवडिलांचं, समाजाचं काहीच ऐकायला तयार नव्हती... सतत हॉकीचा खेळ पाहून तिनं नक्की ठरवलं होतं 'जग इकडचं तिकडे होवो पण मी हॉकीच खेळणार!'

४ डिसेंबर १९९४ साली शाहबादमध्ये एका अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेल्या राणी रामपालचं आतापर्यंतचं जीवन म्हणजे एका खडतर संघर्षाची यशोगाथा आहे... कधीही पूर आला की वाहून जाणारं मातीचं घर, दोन वेळच्या खाण्याची भ्रांत, कसल्याही सुखसोयी नसताना, धड पोटभर अन्न मिळण्याची मारामार असताना, कुठून निर्माण झाली या टीचभर मुलीच्या मनात इतकी मणभर जिद्द? आजूबाजूला सतत खाली खेचणाऱ्या परिस्थितीविरुद्ध एकाकी डाव कसा मांडला असेल या मुलीनं? राणी एक आठवण सांगते,

''मी प्रशिक्षणाच्या वेळी मिळणारा खाऊ एकदा खिशात लपवला होता. *कोचच्या* ते लक्षात आलं आणि मला शिक्षा म्हणून डबल *ट्रेनिंग* करावं लागलं. नंतर मी असं कधीही केलं नाही म्हणा; पण ''काय करणार? भूक खूप लागायची ना तेव्हा!'' घरच्या परिस्थितीमुळे अर्धपोटी राहणाऱ्या या मुलीचं प्रशिक्षण पहाटे ५ वाजता असे. यासाठी 'मला ३ वाजता उठव' असं आईला सांगून राणी झोपी जाई... पण आई उठवणार कशी? त्यांच्याकडे घड्याळ सुद्धा नव्हतं. यावर आईनेच शक्कल लढवली, रात्ररात्र चांदण्या पाहात आई जागी राहत असे, जेणेकरून ताऱ्यांवरून आणि उजेडावरून वेळ कळत राहावी..

आज राणीनं ज्या काही यशाच्या मखमली पायघड्या मिळवल्या आहेत; त्या विणण्याची सुरुवात ही अशी इथून झालेली होती.. राणी गप्प बसणाऱ्यातली नव्हतीच.. ती म्हणते, ''आमच्या शाळेत एकदा लेखनाची स्पर्धा होती, मला काही लिहायची फार आवड होती, अशातला भाग नाही; पण त्या स्पर्धेत मी मुद्दाम पूर्ण तयारीने भाग घेतला आणि प्रथम बक्षीस पटकावलं. का? तर त्यात पहिलं येणाऱ्याला एक गजराचं घड्याळ बक्षीस मिळणार होतं!''

कोच सरांना सांगून, घरच्या लोकांची कशीबशी मनधरणी करून, मैदानावर सापडलेल्या एका मोडक्या *हॉकी स्टिकसह*, सलवार कमिझ घालून का असेना पण राणीनं हॉकी *अकॅडमीत* प्रवेश मिळवला... तिथं खेळाडूनं रोज स्वतः साठी अर्धा लिटर दूध घेऊन येण्याची अट होती. तुटपुंज्या मिळकतीत राणीच्या आईवडिलांना दूध कुठं परवडणारं होतं? पण राणीनं यावरही तोडगा शोधला... कसंबसं मिळणाऱ्या २०० मिली. दुधात ३०० मिली. पाणी मिसळायचं की, झालं अर्धा लिटर दूध! पुढे राणी पहिल्यावहिल्या सामन्यात जेव्हा रु. ५००/- जिंकली तेव्हा तिने ते पैसे आपल्या वडिलांना दिले. त्यांनी इतकी मोठी रक्कम खरोखर त्यांच्या आयुष्यात प्रथमच पाहिली होती...

एखाद्या जोहरीने हिऱ्याची पारख करावी त्याप्रमाणे राणीचे प्रशिक्षक बलदेव सिंहजी यांनी राणीमधलं कौशल्य हेरलं! द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त या प्रशिक्षकाने आपल्या एकलव्याला अर्जुनाच्या पात्रतेपर्यंत नेतानाच केवळ प्रशिक्षक नव्हे तर एक पालक, एक मार्गदर्शक, एक मित्र अशा अनेक भूमिका लीलया बजावल्या .. राणीला हॉकीचा ड्रेस आणि *किट* घेऊन देणं इतकंच नव्हे, तर तिच्या आहाराकडे विशेष लक्ष देणं या महत्त्वाच्या गोष्टींमध्ये बलदेवजींचं राणीला खूपच

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१४ - इस्रो (ISRO) - भारत - अंतराळ तंत्रज्ञान विकसित करून त्याचे प्रभावी उपयोजन

वार्षिक देणगीदार - • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

सहकार्य मिळालं.

'...इवली शल्ये रुपती खुपती मात करू दे त्यांच्यावरती' असं म्हणत या हॉकीच्या जगतात साम्राज्य प्रस्थापित करू पाहणाऱ्या राणीचा तिच्या हॉकी *करिअरचा* एक अत्यंत महत्त्वपूर्ण प्रवास इथून पुढे सुरू झाला. वयाच्या १४ व्या वर्षी २००८ साली राणी भारताच्या *टीममध्ये* खेळली. त्यावेळी ती वयानं सर्वात लहान खेळाडू होती! पुढे २००९ मध्ये सुद्धा FIH Women's Champions Challenge मध्ये देखील ती सर्वात लहान खेळाडू होती. इतकंच नव्हे, तर त्याचवर्षी झालेल्या आशिया कप स्पर्धेत राणीच्या अथक प्रयत्नांमुळे भारतीय महिला संघ रौप्य पदक जिंकू शकला.

२०१० सालच्या विश्वचषक स्पर्धेत तर ७ पैकी ५ गोल एकट्या राणीचेच होते! २०१२ साली मात्र राणीचा सहभाग असणाऱ्या संघाला पराभव पत्करावा लागल्यामुळे लंडन ऑलिम्पिकमध्ये त्यांना सहभागी होता आलं नाही. याबद्दल बोलताना राणी म्हणते, ''या आधीही काही वरिष्ठ खेळाडूंना मी पराभूत झाल्यानंतर खूप रडताना पाहिलं होतं. हार आणि जीत यांपैकी काहीतरी एक घडणार त्यात रडायचं काय? असा तोपर्यंत माझा समज होता; पण जेव्हा २०१२ साली आम्ही पराभूत झालो तेव्हा माझ्या लक्षात आलं की, अतिशय अल्पायुषी *करिअर* असणाऱ्या या खेळामध्ये *सीनिअर* खेळाडूंना एका सामन्यात पत्करावी लागणारी हारसुद्धा, किती महागात पडू शकते. कदाचित वयोमर्यादेमुळे पुढच्यावेळी ते खेळाडू खेळूच शकले नाहीत तर..? आणि त्याक्षणी मला त्या हरण्याचं मोल चांगलंच कळून चुकलं!''

अर्थात या पराभवाने खचून न जाता राणीनं

जपानमध्ये झालेल्या पुढच्या सामन्यात २०१५ साली एकमेव गोल संपादन केला ज्यामुळे हा संघ रिओ ऑलिंपिक्समध्ये खेळण्यासाठी पात्र ठरला! या निवडीमुळे एक इतिहास रचला गेला ...१९८० नंतर प्रथमच भारतीय महिला संघ हॉकी खेळण्यासाठी ऑलिम्पिकमध्ये उतरला!! भले त्यांनी काही सामने जिंकले असोत वा नसोत, राणीच्या मते, भारतीय हॉकीमध्ये आलेल्या नव्या बदलासाठीची ती एक नांदी ठरली!

एकट्या शाहबादमधील १२ खेळाडू आज भारतीय महिला संघात आहेत. हा निव्वळ त्या खेळाडूंनी रचलेला इतिहास नसून एका पुरुषसत्ताक पद्धतीविरुद्ध मिळवलेला विजय आहे, आपल्या हक्कासाठी उठवलेलं रान आहे, मळलेल्या वाटा सोडून चाकोरीबाहेर जाऊ पाहणं आहे! इथून पुढे क्रीडा जगतात येऊ पाहणाऱ्या उभरत्या स्त्री खेळाडूंसाठी कोरलेली एक पायवाट आहे! राणीला आपल्या आयुष्यात आपल्या ध्येयाबद्दल स्पष्टता असणं हे फार महत्त्वाचं वाटतं... एका मुलाखतीत राणी म्हणते, ''माझ्या आईवडलांबद्दल माझ्या मनात अजिबात राग

नाहीये, खरंच त्यांना जे काही शक्य होतं ते सगळं त्यांनी केलं ...समाजाचा रोष पत्करून सुद्धा 'बेटा, तुझं समाधान होईपर्यंत तू खेळ!' असं माझ्या वडिलांनी मला सदैव प्रोत्साहन दिलं ...आज मला वाटतं, आम्ही गरीब होतो, आम्हाला खूप अडचणी होत्या हेच बरं होतं; कारण त्यामुळे माझ्या मनात काहीतरी चांगलं करून दाखवण्याची जिद्द निर्माण झाली.. आजही जेव्हा अनेक मानसन्मान मिळतात, आमचं प्रचंड कौतुक होतं तेव्हा मी मनोमन माझे जुने दिवस आठवते. त्यामुळे माझे पाय आपसूक जमिनीवर राहतात. अजून खूप खेळायचं आहे आम्हाला! माझे प्रशिक्षक आणि माझे आईवडील यांना सुवर्णपदक मिळवून दाखवायचं आहे!''

आज तिने तिच्या हिकमतीवर शाहबादमध्ये एक टुमदार घर बांधलं आहे, ज्याच्या छतावर ऑलिम्पिकची पाच वर्तुळे कोरली आहेत!

भारताच्या महिला संघाचं कप्तानपद मिळूनही यश अजिबात डोक्यात न जाऊ देणारी हरयाणवी कन्या राणी आणि इतर कन्यकांनी *'आज हमरी छोरिया छोरों से कम है के?'* या संवादाला एक निराळीच उंची प्राप्त करून दिलेली आहे, हे विसरता येणार नाही!

सुप्रिया कुलकर्णी-खोत
जी ७/१०३, गंगाधाम फेज २,
बिबवेवाडी-कोंढवा रस्ता, पुणे 411037

पाहा
आंतरराष्ट्रीय महिला हॉकी ऑलिंपिकसाठीच्या भारत विरुद्ध अमेरिका यांच्या पात्रता फेरी सामन्याची चित्रफीत

तुम्हाला माहीत आहे का?

कुठून आला कोबी?

हजारो वर्षांपूर्वी कोबी ही अगदी निरुपयोगी वनस्पती होती. युरोपातील वेगवेगळ्या किनारपट्टीवर ही वनस्पती उगवायची. तिला भपकेबाज पिवळी फुले होती व तिच्या पानांची कडा कातरलेल्या नक्षीसारखी म्हणजे झालरीसारखी होती.

मूळच्या या जंगली वनस्पतीपासून पुढे कोबीच्या १५० जातींची खास लागवड करण्यात आली. कोबीच्या गड्ड्याच्या केंद्रस्थानी एक मुख्य कळी असते व तिच्यापासून पाने फुटतात. पाने एकत्र वाढतात. तांबडा व पांढरा कोबी कोशिंबिरीत कच्चा खातात. पांढऱ्या व तांबड्या कोबीची पाने मऊ असतात. पांढरा कोबी शिजवतात व त्याची भाजी करतात.

कोबीचे अनेक रुचकर पदार्थ युरोपात व आशियात जेवणात करतात. कोबीची ताजी पाने औषधी असतात. डोके दुखत असताना कोबीची ताजी पाने कपाळावर ठेवल्यानंतर डोके दुखणे थांबते! हा घरगुती औषधोपचार आहे.

- संकलन

वाचा - लेख
ओळख कीटकभक्षी वनस्पतींची
ले. प्रशांत दिवेकर

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१५ - विवेकानंद केंद्र - भारत - स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रसार

वार्षिक देणगीदार - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • श्री. नागेश साने, पुणे • श्रीमती लीला आचवल, नाशिक

करून तर पाहा

पॉप अप कार्ड

साहित्य – रंगीत *कार्डशीट* २, कागद, पेन्सिल, कात्री, रंग, *ब्रश*

कृती –

१. सर्वप्रथम एक कार्डशीट घेऊन (३० सेमी × १५ सेमी) ती मधोमध दुमडा.

२. दुमडल्यानंतर आकृती १ मध्ये दाखवल्याप्रमाणे पेन्सिलने दोन रेषा आखून घ्या व आकृती क्र.२ प्रमाणे कात्रीने या रेषा कापा.

३. आकृती क्र.३ मध्ये दाखविल्याप्रमाणे दुमडलेला कागद उलगडून घ्या आकृती क्र. ४, ५ मध्ये दाखवल्याप्रमाणे कापलेल्या रेषेतून बोट घालून कागद बाहेरच्या बाजूला ओढून घ्या. म्हणजे चोचीप्रमाणे आकार दिसेल. (आकृती क्र. ६)

४. आता या चोचीभोवती किंवा तोंडाभोवती कोणत्याही पक्ष्याचे,माशाचे किंवा एखाद्या मगरीचे चित्र रेखाटा. (आकृती क्र. ७)

५. ही रेखाटलेली चित्रं जलरंगाने अथवा *स्केचपेनच्या* साहाय्याने रंगवून घ्या. शेवटी दुसऱ्या रंगाचा कागद (३० सेमी × २२ सेमी) पहिल्या कागदाच्या मागे दोन्ही उभ्या कडांनी चिकटवून घ्या.

आता दोन्ही *कार्डशीट* पुन्हा एकदा मधोमध दुमडून घ्या. आणि कार्डशीटची उघडझाप करून बघा...


आकृती क्र. १


आकृती क्र. २


आकृती क्र. ३


आकृती क्र. ३


आकृती क्र. ५

आकृती क्र. ६


आकृती क्र. ७

आकृती क्र. ८

– **अपर्णा म्हात्रे,** १/७, विठाबाई निवास, शास्त्रीनगर, सखाराम कॉम्प्लेक्सजवळ, डोंबिवली (पश्चिम), 421202

छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!

वार्षिक वर्गणी : ₹ २०० **इ–अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००** (दिवाळी अंक सोडून)

ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!! subscription/सभासदत्व येथे क्लिक करा!

आपला हात जगन्नाथ!

– एकनाथ आव्हाड

माधव, नको रे त्या टॉमीचं शेपूट असं ओढूस. त्याला त्रास होतोय. ते तुला कळत नाही का? तुझा कान कुणी ओढला की, तुला कसं वाटेल? होईल ना तुला त्रास? मग, तसाच त्रास त्या टॉमीलाही होतोय. आणि कुत्रा, कुत्रा का म्हणतोस त्याला? त्याला नाव आहे ना चांगलं! येरे, टॉमी माझ्याजवळ. ये ये, अस्सं. बस...बस इथे बस! हुशार आहे आमचा टॉमी. दहा दिवसांत साऱ्यांना लळा लावला.

माधव, हा टॉमी तुझ्यावर येता, जाता भुंकतो म्हणून तू त्याच्यावर राग काढतोस ना? पण आमच्यावर कसा तो भुंकत नाही. तुझ्यावरच तो का भुंकतो, याचा कधी विचार केलायंस तू? अरे, तूच त्याचा सतत राग-राग करत असतोस. उठसूठ त्याच्या खोड्या काढत असतोस. मग तो तरी किती वेळ गप्प बसणार? त्याचा राग तो व्यक्त करणारच ना! म्हणून मग तो तुझ्यावर गुरगुरतो. भुंकतो. कळलं?

लक्षात ठेव माधव, एका हाताने टाळी कधीच वाजत नाही. प्राणीमात्रांवर प्रेम करा, असं आपण नुसतं म्हणायचं; पण तसं वागायचं मात्र नाही, त्यांच्या मदतीला धावून जायचं नाही, नुसतं हातावर हात ठेवून पाहत राहायचं. याला काय अर्थ! असं दुटप्पी वागणं माणूसकीला शोभा देतं का? आता तुझा संदेशदादाचं बघ ना... तो घरी आला की, हाच टॉमी कसा अगदी शहाण्यासारखा त्याच्याजवळ जाऊन बसतो. मित्रासारखा त्याच्यासोबत खेळतो; कारण तुझा संदेशदादा त्याच्यावर मनापासून प्रेम करतो.

हातच्या कंकणाला आरसा कशाला? आता तुझा संदेशदादा घरी येईल. तेव्हा तूच बघ हा टॉमी कसा वागतो त्याच्याशी ते! त्यांच्यातला जिव्हाळा तुला दिसेलच..! माधव, अरे हे मुके जीव असतात ना ...आपण त्यांच्यावर एकपट प्रेम केलं की ते आपल्यावर दसपट प्रेम करतात. आपले अगदी खरेखुरे मित्र होतात. हात ओला तर मित्र भला... असं त्यांचं वागणं कधीच नसतं. त्यामुळे आजपासून तूसुद्धा टॉमीशी दोस्ती कर. मग बघ गंमत. हा टॉमीसुद्धा तुझ्याशी किती छान दोस्ती करतो ते!

नुसता 'हो' नको म्हणूस, तर तसं 'दिसू' दे तुझ्या वागण्यातून. काय? खरं की नाही.

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१६ – अक्षय पात्र फाउंडेशन – भारत – विद्यार्थ्यांसाठी शालेय भोजनाचा उपक्रम

वार्षिक देणगीदार – • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे
• डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

माधव मला काय वाटतं सांगू, आपल्या वागण्याचा कुणाला त्रास होईल असं आपण वागूच नये रे. हात दाखवून अवलक्षण कशाला ओढवून घ्या. अरे, त्यामुळे आपलेच हसे होते. नेहमी वाटतं, आपल्याकडे जे दोन हात आहेत ना, त्याचा वापर आपण नेहमी चांगल्या कामासाठी करावा. तू परवा बघ, कुंडीत तुळशीचं छोटंसं रोप लावलं होतंस; आणि आज बघ ते रोप कसं, तरारून वर आलंय. थोडं मोठं झालंय...

आणि तुला आठवतंय माधव, तू स्वतः तयार केलेलं, चित्र काढून रंगवलेलं आणि त्यात माझ्यासाठी वाढदिवसाच्या काव्यमय शुभेच्छा लिहून ते भेटकार्ड तू मला वाढदिवसाला दिलं होतंस. खरं सांगू, त्या वाढदिवसाच्या दिवशी मला मिळालेली सर्वात सुंदर भेट होती माझ्यासाठी; कारण तू तुझ्या स्वतःच्या हातांनी ते तयार केलं होतंस. म्हणून खूप आवडलं मला. ही तुझी गोष्ट खरंच वाखाणण्यासारखीच आहे.

मला वाटतं माधव, प्रत्येक माणसाने आपल्या हातांचा

उपयोग छान कामासाठी करावा. म्हणजे कसा ते सांगू... तुला?

दीनदुबळ्यांना नेहमी,
मदतीचा हात द्यावा.
जो माणुसकी जपेल त्याला,
मनापासून हात जोडावा!
तुरी हातावर देईल त्याच्या मात्र,
हात धुऊन पाठीस लागावे.
संकट धावून आले जरीही,
हातपाय गाळून बसू नये!
संकटाशी दोन हात करावे
संकटापुढे हात टेकू नये
हातापाया पडून कधीही,
फायदा स्वतःचा साधू नये!
उगारण्यासाठी नाही बरं,
उभारण्यासाठी आहेत हात.
ध्यानात ठेवावे आयुष्यात,
आपला हातच जगन्नाथ!

माधव खऱ्याखुऱ्या आयुष्यात आपला हातच आपला जगन्नाथ असतो. काय म्हणालास? हातचे सोडून पळत्याच्या पाठीसुद्धा कधी लागू नये. अगदी बरोबर! आणि हो बेटा, दुःखितांचे अश्रू पुसण्यासाठी आपले हात नेहमीच पुढे असले पाहिजे. तसेच कामाच्या वेळीसुद्धा आपले हात नेहमी तत्पर असले पाहिजे; कारण हात फिरे तिथेच लक्ष्मी फिरे.

काय रे टॉमी खरं की नाही? अरे व्वा..! माधव या टॉमीलासुद्धा आपलं म्हणणं पटलं बहुतेक..! गडी कसा अगदी होकारार्थी मान हलवतोय बघ!!

– एकनाथ आव्हाड
फ्लॅट नं. १ , पहिला मजला, ए विंग,
शृंगारपुरे हाऊस, १० वा रोड, चेंबूर,
मुंबई 400071

(कृतिपाठ – लेखात आलेल्या हात या अवयवावर आधारित वाक्प्रचार व म्हणींची यादी करा व त्यात भर घाला.)

वाचा
कथा – पंख होते तो...
लेखिका – अश्विनी धोंगडे

श्रमाने फुलतील जगी, आनंदाच्या बागा। श्रमाची टिकेल प्रतिष्ठा, असेच कायम वागा।।

वार्षिक देणगीदार – • डॉ. वर्षा बखले, चेंबूर, मुंबई • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई
• कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

विज्ञान प्रयोग

फुलाचा रंग बदलता येतो का?

साहित्य – पांढऱ्या रंगाची ३ फुले देठासकट (उदा. सदाफुली, शेवंती, धोत्रा, रूई इ.) ३ पारदर्शक काचेची भांडी, खायचा रंग, (निळा आणि लाल), सुरी, पाणी, पाणी मोजायला भांडे, मोजपट्टी.

कृती –



आकृती क्र. १

१) पांढऱ्या रंगाची ३ फुले घ्या. प्रत्येक फुलाचे देठ एका ठरावीक अंतरांवर (उदा. २० सेमी) सपाट न कापता आकृती क्र. १ मध्ये दाखविल्याप्रमाणे एका विशिष्ट कोनामध्ये तिरपे कापा. (सपाट कापले तर काय होईल?)

२) तीन पारदर्शक काचेची भांडी घ्या आणि त्यामध्ये सारख्या आकारमानाचे पाणी घ्या.

३) एका भांड्यात निळा तर दुसऱ्या भांड्यात लाल रंग टाकून, हलवून रंगीत पाणी तयार करा. तिसऱ्या भांड्यातील पाणी आहे तसेच ठेवा.

४) आता या प्रत्येक भांड्यात आपण कापलेले एक-एक फूल आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे ठेवा. २४ तास थांबा आणि वर दिलेला तक्ता पूर्ण करा.

आकृती क्र. २

	साधे पाणी	निळे पाणी	लाल पाणी
१. देठाची लांबी			
२. सुरुवातीला घेतलेले पाणी			
३. फुल पाण्यात (टाकल्याची तारीख आणि वेळ)			
४. फुलांचा रंग (सुरुवातीचा)			
५. फुल बाहेर काढल्याची तारीख आणि वेळ			
६. शिल्लक पाणी			
७. फुलांनी शोषलेले पाणी (सुरुवातीचे पाणी- शिल्लक पाणी)			

काय घडते?

रंगीत पाण्यात ठेवलेल्या फुलांचा रंग बदलतो.

पारदर्शक काचेच्या भांड्यांमधील पाण्याची पातळी कमी होते.

असे का घडते?

२४ तासांमध्ये पानांच्या/फुलाच्या पृष्ठभागावरच्या पाण्यांच्या रेणूंचे बाष्पीभवन होते. रेणूंच्या एकत्रीकरणामुळे पानांच्या/फुलाच्या पृष्ठभागावरचे पाणी पुनर्स्थित करायला खोड भांड्यातील पाणी खेचून घेते. या प्रक्रियेला 'बाष्पोत्सर्जन' (Transpiration) म्हणतात. यामुळेच फुलाच्या पाकळ्यांचा रंग बदलतो. याच प्रक्रियेमुळे वनस्पतींना मातीमधील पोषक तत्त्वे मिळू शकतात.

करून बघा

अशाप्रकारे रंगीत केलेले फूल परत पांढरे करता येईल का? कसे?

(पूर्वप्रसिद्धी – छात्र प्रबोधन-सुबोध अंक, आषाढ/जुलै २०१७)

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१६ – सुलभ इंटरनॅशनल – भारत – सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन देणारी सामाजिक सेवा संस्था
वार्षिक देणगीदार – • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे • एक हितचिंतक, दिल्ली • श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

नीलगायी दिसल्या नाहीत, पण...

– किरण पुरंदरे

पिटेझरी हे गाव भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात येतं. सुमारे ७०० वस्तीच्या या गावाच्या जवळ प्रसिद्ध नागझिरा अभयारण्य आहे. आता नवेगाव–नागझिरा हे व्याघ्र राखीव क्षेत्र म्हणून घोषित केलं आहे. गावाच्या जवळ एक तलाव आहे. या तलावाच्या बांधातून पाणी झिरपतं. त्यामुळे तलावामध्ये वर्षभर पाणी राहात नाही. तलावाच्या सभोवताल जंगल आहे. हे उष्ण कटिबंधीय पानगळी प्रकारचं जंगल आहे. तलावाच्या बांधाच्या खाली भातशेती आहे. शेतीच्या कडेला गाव वसलं आहे. तलाव कोरडा असला, तरी परिसरात जंगल असल्यामुळे वरचेवर आश्चर्याचे धक्के बसत असतात. असे धक्के खायला खूप मजा येते. त्यामुळे तलावाच्या परिसरात फिरायला जाणे, हा माझा छंद झाला आहे.

गेले काही दिवस संध्याकाळी ५.३० च्या सुमारास तीन नीलगायी जंगलातून चालत बाहेर येतात आणि तलावाच्या एका कोपऱ्यात चरतात, असं माझ्या पाहण्यात आलं होतं. या नीलगायींमध्ये एक प्रौढ मादी, एक तरुण मादी आणि एक तरुण नर आहे. मी जेव्हा नीलगायींचं हे त्रिकूट पाहिलं, तेव्हा माझ्या मनात विचार आला की, उतरत्या ऊन्हात त्यांचे फोटो फार सुंदर येतील; पण परिसरात कुठेही माणूस दिसला की, या नीलगायी गाल फुगवून 'भाँ' असा खर्जातला आवाज काढत जंगल जवळ करतात.

आज मात्र मी असं ठरवलं की, नीलगायी जंगलातून मोकळवनात येण्याच्या आधी किमान दोन तास जंगलामध्ये अक्षरशः दगड होऊन बसून राहायचं. त्यादृष्टीने तयारी केली. आणि

बरोबर दुपारी ३.३० वाजता निसर्गाच्या रंगाशी मिळताजुळता पेहराव करून आणि काखेत एक घडीची खुर्ची घेऊन मी निघालो. या खुर्चीत बसायचं आणि नीलगायींवर लक्ष ठेवायचं, असा बेत आखला. घरातून बाहेर पडलो तेव्हा आमचा कालू हा कुत्रा एका पेरूच्या झाडाखाली बसलेला दिसला. मी त्याच्याकडे बघून दटावणीच्या सुरात म्हणालो, 'कालू चूप! अजिबात यायचं नाही!' माझा आवाज ऐकताच कालूनं कान टवकारून माझ्याकडे बघितलं आणि तो तिथेच बसून राहिला.

मी त्याच्याकडे दुर्लक्ष करत जंगलाची वाट पकडली. पहिल्यांदा भातशेती लागली आणि मग नंतर काहीसं विरळ पानझडी जंगल सुरू झालं. तलावाच्या रिकाम्या पात्रातून भरभर चालत मी जंगलाच्या दिशेनं निघालो. जंगलावरून उडणारा एक शिकारी पक्षी दिसला, म्हणून क्षणभर थांबलो. तेवढ्यात माझ्या

उजव्या बाजूला कालू महाराज दिसले. त्याला बघून मला खूप राग आला; कारण तो नेहमी माझ्यापुढे धावतो आणि सगळे पक्षी उडवतो. मी एक बांबूची छडी उचलून त्याच्या जवळ गेलो आणि बराच आरडाओरडा केल्यावर तलावाचा बांध ओलांडून कालू पलीकडे गेला. मी जंगलाच्या आतून; पण तलावाचा बांध दिसेल अशा पद्धतीनं चालत-चालत, एका मोहाच्या झाडापाशी येऊन उभा राहिलो. जंगलाच्या ज्या भागातून नीलगायी मोकळ्या भागात चरायला येतात, ती जागा आता मला बरोबर समोर दिसत होती. मी हिरव्या रंगाच्या खुर्चीची घडी उलगडली आणि बैठक जमवली.

बसल्या जागी आजूबाजूचे पक्षी बघायला सुरुवात केली. तलावाच्या कोरड्या पात्रात कोतवाल (black drongo) बसले होते. गवतामधून ठिपकेदार होले (spotted dove) माना खाली घालून काहीबाही टिपत होते. एका निष्पर्ण झुडपाच्या काडीवर बंड्या धीवर (white-throated kingfisher) बसला होता. दुसऱ्या एका झाडाच्या शेंड्यावर तीसा (white-eyed buzzard) हा छोट्या आकाराचा शिकारी पक्षी टपून बसला होता. थोड्या वेळानं तलावाच्या उजव्या कोपऱ्यातून एकेक करत म्हशी आल्या. पाणी नसलेल्या तळ्याच्या विस्तीर्ण पात्रात आल्यावर म्हशी इकडे तिकडे पांगल्या. माना खाली घालून चरू लागल्या.

तेवढ्यात दूर, तलावाच्या बांधाजवळ मला कालू दिसला. तो वानरांच्या मागे लागला होता. उंबराच्या झाडावर चढलेल्या वानरांकडे बघत कालू चार पायांवर नाचत होता. पण हे दृश्य माझ्या दृष्टीनं नेहमीचंच होतं. नीलगायी केव्हाही येऊ शकतील अशी वेळ झाली, तेव्हा मी माझा एक हात कॅमेऱ्यावर ठेवला आणि खुर्चीतल्या खुर्चीत नीट सावरून बसलो. आता मला तसूभरही हालचाल

तलावाचे विस्तीर्ण पात्र

करायची नव्हती. मी जंगलाशी कमालीचा एकरूप झालो होतो. हळूहळू चरणाऱ्या म्हशी तलावातून बाहेर पडल्या आणि परतीच्या वाटेला लागल्या.

तेवढ्यात पाण्यात काहीतरी पडल्याचा मोठा आवाज झाला म्हणून मी चमकून उजवीकडे पाहिलं. तेव्हा तलावाच्या बांधाजवळ असलेल्या पाण्याच्या डबक्यात कालूनं उडी मारल्याचं मला दिसलं.

तलावाच्या बांधाजवळील डबकं - बरोबर इथेच कालूनं वानर पकडलं त्याची उडी पाण्यात पडताच, डबक्याच्या कडेला शिकारध्यान लावून बसलेले पाच-सहा वंचक (indian pond heron) 'कॉक् - कॉक् - क्राक् - क्राक्' आवाज करत फडफडले. फक्त उडतानाच दिसणारे त्यांचे पांढरे पंख लकाकले. डबक्यावर बरीच हालचाल झाली. डबक्याच्या खोलगटीत क्षणभर नाहीसा झालेला कालू मला दिसला तेव्हा त्याच्या तोंडात वानराचं पिल्लू होतं! अफलातून धाव घेत कालूनं वानर पकडलं होतं. हे सगळं मी दुर्बिणीतून नीट पाहात होतो. अजूनही सूर्यास्त झाला नसल्यामुळे प्रत्येक गोष्ट मला स्पष्ट दिसत होती. कालू अधूनमधून वानराला चावत होता आणि आजूबाजूला बघत होता. तलावाच्या बांधाकडेही पहात होता.

तळ्याच्या बांधावर झाडाझुडपांची दाटी झाली होती. काय झालं ते मला कळलं नाही; पण

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१७ - एकल अभियान ट्रस्ट - भारत - दुर्गम भागातील ग्रामीण आणि आदिवासी मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यात योगदान.
वार्षिक देणगीदार - • श्री. शरद पालकर, पुणे • श्री. अजय घाणेकर, पुणे • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे

कालू अचानक प्रचंड घाबरला. त्यानं तोंडातलं वानर तसंच खाली टाकलं आणि काही अंतर बांधाच्या विरूद्ध दिशेला पळत गेला. जागेवरच वळला आणि बांधाकडे बघून जोरजोरात भुंकायला लागला. मी तटकन् उभा राहिलो आणि दुर्बिणीतून पाहू लागलो. तळ्याच्या बांधाच्या उतारावर मला एक सुंदर बिबट्या दिसला! दिसला, दिसला म्हणेपर्यंत नाहीसा देखील झाला...

आता कालू का ओरडत होता याचं कारण मला कळलं.

बिबट्याला एवढ्या जवळ बघून प्रचंड घाबरलेला कालू सतत पंधरा मिनिटं ओरडत होता. त्याचा आवाज जंगलभर घुमत होता. त्यानं वानर मारलं आहे, हे बघितल्यावर पांगलेल्या वानरांच्या टोळीचा भड्या (वानरटोळीचा म्होरक्या) जीव खाऊन खेकसायला लागला – 'खॅक् खॅक्! – खॅकोऽऽ खॅक्!' 'खॅक् खॅक्!' माझ्या लक्षात आलं की, कालूची चांगलीच तंतरली होती. तो यमाच्या दरबारात उभा होता. त्याला तिथून बाहेर पडण्याची वाट ठाऊक होती; पण त्याला एका मिनिटांत संपवण्याची ताकद असलेला बिबट्या आज मधे आला होता. हा बिबट्या कालूपासून सुमारे पन्नास फुटांवर झाडाझुडपांच्या जाळीत लपून बसला होता. मला कालूची खूप कीव आली. त्याची बंधारा ओलांडून पिटेझरी गावाच्या शिवारात जायची छाती होईना. तो पूर्णपणे एकटा पडला होता. बिबट्याचा कानोसा घेऊन त्याच्या रोखानं बघत, खूप मोठ्या आवाजात भुंकत होता. मी पटकन् खुर्ची गुंडाळली आणि मोहाच्या झाडाच्या बेचक्यात अडकवली. कॅमेऱ्याची बॅग पाठीवर टाकली आणि भरभर चालत कालूच्या दिशेनं निघालो. कालूनं मला लांबूनच पाहिलं आणि एक पाय दुखावलेला असूनसुद्धा खूप

जोरात धावत तो माझ्याकडे आला. मला त्याच्या डोळ्यात आनंदाचं 'कांचनगंगा' दिसलं. तो माझ्या अवतीभोवती पिंगा घालू लागला, माझ्याशी शिवणापाणी खेळल्यासारखा पळायला लागला. माझ्या पायाशी यायला लागला. मी त्याला नेहमी थोपटतो, तसं मानेच्या उजव्या बाजूला थोपटलं. मला पाहिल्यावर त्याला किती बरं वाटलं, हे शब्दांत सांगणं अवघड आहे.

मी कालूला सोबत घेऊन जिथं वानर पडलं होतं, त्या जागेच्या जवळ आलो. वानराचा पत्ताच नव्हता! याचा अर्थ, मी खुर्ची वगैरे गुंडाळून निघण्याच्या तयारीत असतानाच्या काळात बिबट्यानं वानर पळवलं होतं. जिथं वानर पडलेलं होतं. त्या जागेचा कालू अधाशासारखा वास घ्यायला लागला. त्यानं गवताच्या काड्यांची टोकंही पुन्हा पुन्हा हुंगली. मी परत एकदा तलावाच्या बांधाकडे पाहिलं. तिथं काहीही दिसलं नाही. आम्ही दोघांनी तलावाच्या बांधाला समांतर चालत गावात जाणारी पायवाट पकडली. मी भेटूनसुद्धा कालू इतका धास्तावला होता की, तो सतत माझ्या मागे-मागे राहात होता. मी त्याची ढाल झालो होतो. या वाटेला एक झोकदार वळण आहे. हे वळण संपलं की, ती अचानक अरूंद होते. आम्ही जेव्हा या अरूंद वाटेला लागलो, तेव्हा कालू पुन्हा एकदा प्रचंड घाबरला. एकसारखा डावीकडच्या जंगलाकडे बघत मान

स्वकष्टाने जगण्यासाठी, लागते मोठी हिंमत। केवळ पैशाने करू नका, श्रमांची किंमत।।

वार्षिक देणगीदार – • श्री. तन्मय बुडुख, सिॲटल, अमेरिका • श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई
• असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे

वर करून वास घ्यायला लागला. कान उभारून आवाज घेऊ लागला. दचकून झटके बसल्यासारखं करू लागला. तो इतका घाबरला होता की, कालू माझ्या मागून अचानक खूप जोरात पळाला आणि एकदम पुढे गेला. कालू अचानक माझ्याजवळून धावत गेल्यामुळे मीही प्रचंड घाबरलो.

पोटात गोळा यावा असा जंगलाचा पट्टा आम्ही थोड्याच वेळात मागे टाकला आणि तलावाकडून येणाऱ्या कालव्याच्या काठावर आलो. तेव्हाही कालू आजूबाजूला बघत, सतत इकडून तिकडे मान हलवत, पळण्याच्या जय्यत तयारीत होता. कालव्याच्या आजूबाजूलासुद्धा झाडं–झुडपं दाटली होती. त्यामुळे अजूनही धोका संपलेला नव्हता.

शेवटी कालवा ओलांडून आम्ही दोघंही भाताच्या खाचरांमध्ये उतरलो. समोर पिटेझरी गाव दिसायला लागलं. मला हुश्श झालं. घर जवळ आल्यावर कालू इकडे तिकडे न करता घराच्या परसात गेला आणि पेरूच्या झाडाखाली असलेला पालापाचोळा पायांनी बाजूला करून अंगाचं मुटकुळं करून गुमान बसून राहिला.

आज मी जर तलावाच्या बाजूला गेलो नसतो, तर अंधाराचा फायदा घेऊन बिबट्यानं कालूचं नरडं पकडलं असतं. कालूला हूं की चूं करायची संधीसुद्धा मिळाली नसती. शिकारीचा डाव जिंकून देणाऱ्या हुकमी एक्क्यासारख्या बिबट्याच्या सुळ्यांपुढे कालू उणा पडला असता!!

– किरण पुरंदरे

pakshiweda@yahoo.co.in

ऐका
ललित लेख – पेल्यामागचं गुपित
लेखक – प्रसाद सांडभोर
वाचनस्वर – मीनल नागपूरकर

निरीक्षणातून प्रयोगाकडे

वेगवेगळे आवाज ऐकूया...

चला, आपल्या आजूबाजूचे वेगवेगळे आवाज ऐकूया आणि त्याचे आपल्या पद्धतीने वर्गीकरण करूया !

बऱ्याचदा आपल्या आजूबाजूचे निरीक्षण करताना आपण आपल्या डोळ्यांवर जास्त भर देतो आणि सर्व माहिती दृश्य स्वरूपाशी जखडून टाकतो. या कृतीमध्ये आपण निरीक्षण करण्याचे व माहिती मिळवण्याचे काम आपल्या कानांनी करण्याचा प्रयत्न करूयात.

कृती : १. बसायला एखादी चांगली जागा शोधा आणि हातात वही–पेन घेऊन तिथे बसा. **२.** बसल्यानंतर आपले डोळे बंद करा आणि वेगळ्या प्रकारचे आवाज किमान दोन मिनिटे ऐका. **३.** तुम्ही ऐकलेल्या सर्व आवाजांची यादी पटापट वहीत नोंदवा. जर तुम्ही आवाजाचा स्रोत ओळखू शकलात तर तोही नोंदवून ठेवा (जसे की – पक्षी, माणसे, यंत्रे इ.). आवाजाचा प्रकार नोंदवा (जसे की एखादे गाणे इ.). आवाजाचे स्पष्टीकरण (जसे की – टिक–टिक, भो– भो इ.). सर्व काही नोंदवण्याचा प्रयत्न करा.

● आता परत तुमचे डोळे दोन मिनिटांसाठी बंद करा आणि भोवतालचे आवाज ऐका; पण या वेळी असेच आवाज नोंदवा, की जे मागच्या यादीत नोंदवलेले नाहीत. ● आता या सर्व आवाजांचे जितक्या जास्त प्रकारांनी वर्गीकरण करता येईल तितक्या प्रकारांनी वर्गीकरण करा. उदा. नैसर्गिक आवाज, मानवनिर्मित आवाज इ. अनेक प्रकारे तुम्हाला वर्गीकरण करता येईल. शेवटी तुमच्या हे लक्षात येईल, की फक्त कानांनीसुद्धा आपण बरीच माहिती मिळवू शकतो आणि निसर्गाचे निरीक्षण बंद डोळ्यांनीही करू शकतो.

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१८ – योहेई सासाकावा – जपान – भारत आणि जगभरातील कुष्ठरोग निर्मूलनासाठी

वार्षिक देणगीदार – ● डॉ. अभय व डॉ. वीणा लिमये, पुणे ● श्री. अजय फाटक, पुणे ● कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

ऑनलाइन अभ्यासासाठी युट्यूबचा प्रभावी वापर कशा पद्धतीने करता येईल, हे मागील २ भागांमध्ये आपण पाहिले. प्रस्तुत लेखात शालेय विषयांच्या पलीकडे जाऊन, व्हर्च्युअल अनुभव घेत माहिती कशी मिळवायची, याविषयी सोदाहरण समजून घेऊया.

तंत्रस्नेही अध्ययन कौशल्य (लेखांक ३)

व्हर्चुअल संग्रहालय भेट

– प्रशांत दिवेकर

संग्रहालये, कलादालने या समाज शिक्षणासाठी निर्माण झालेल्या रचना आहेत. याठिकाणी संग्रह करणाऱ्याचे शिक्षण तर होतेच; पण त्याबरोबर संग्रह व प्रदर्शन पाहायला येणाऱ्या व्यक्तींच्या माहितीत भर घालण्याचे व व्यक्तीची दृष्टी व्यापक करण्याचे कार्य कळत-नकळत होत असते. कलादालनात एका विशिष्ट विषयावर, तात्पुरत्या स्वरूपात प्रदर्शनीय संग्रहवस्तूंची मांडणी केलेली असते; तर संग्रहालयात ही मांडणी रचनाबद्ध आणि कायमस्वरूपी असते. खरे तर संग्रहालय हे मुक्त शिक्षणाचे सर्वोत्तम ठिकाण आहे.

संग्रहालयाचे प्रकार :

१. इतिहास संग्रहालय : इतिहासाशी निगडित संग्रहालय पाहताना व्यक्ती, वस्तू, ठिकाणे यांचा परिचय करून घेत आपण घटनांचा अभ्यास करतो. वस्तू, हत्यारे, कागदपत्रे पाहात मानवी संस्कृती, राजे-राजवाडे यांचा भूतकाळातील प्रवास आपण माहीत करून घेतो.

२. उत्क्रांती इतिहास संग्रहालय : खडक, स्फटिक, मासे, पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी, जीवाश्म यांचे नमुने पाहताना पृथ्वीची निर्मिती, मानवाची उत्क्रांती, जैवविविधता याचा इतिहास सांगणारी मांडणी उत्क्रांती इतिहास संग्रहालयात केलेली असते.

३. सजीव संग्रहालय : वनस्पती उद्यान, प्राणी संग्रहालये, सर्पोद्यान, मत्स्य संग्रहालय यांसारखी ठिकाणे जीवसृष्टीचा परिचय करून घेण्यासाठी महत्त्वाची ठिकाणे आहेत. वनस्पती व प्राणी यांची शरीर रचना, हालचाली, सजीवांचे सहसंबंध, माणूस आणि निसर्ग यांचे नाते अशा अनेक गोष्टींचे दर्शन घडवण्यासाठी ही संग्रहालये अभ्यासकांसाठी महत्त्वाची ठिकाणे आहेत

४. विशेष संग्रहालय : वेगवेगळ्या शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासकीय संस्थांची संस्थांतर्गत संग्रहालयं विशेष परवानगी घेऊन पाहता येतात. सैन्यदल, रेल्वे, संरक्षण विभाग, हवामान विभाग यांसारख्या विशेष खात्यांच्या संग्रहालयांचा समावेश यात होतो. काही वेगळ्या प्रकारच्या वस्तूंच्या संग्रहालयांचा पण या यादीत समावेश करता येईल; जसे बाहुली संग्रहालय, रेल्वे *मॉडेल्स* संग्रहालय, सायकल संग्रहालय, इत्यादी. व्यक्तींची जीवनदर्शनी मांडणाऱ्या संग्रहालयांचा समावेश पण या यादीत करता येईल.

५. आंतरजालावरील व्हर्च्युअल संग्रहालय : वेळ, अंतर आदीचा विचार करता जगभरातील संग्रहालये घरबसल्या पाहता यावीत, यासाठी आज आंतरजालावर अनेक प्रसिद्ध संग्रहालयांची *व्हर्च्युअल* संग्रहालये पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. दोन प्रकारच्या भेटी उपलब्ध आहेत. गॅलरी भेटी आणि ३डी भेटी.

संग्रहालय भेटीची उद्दिष्टे :

१. संग्रह पाहताना मांडलेल्या वस्तूंचे निरीक्षण करणे, प्रदर्शनातील दोन वस्तूंची तुलना करून त्यांच्यातील साम्यभेद शोधणे.

२. संग्रहालयात वस्तूंची मांडणी विशिष्ट क्रमाने केलेली असल्यामुळे मांडणी संदर्भात वस्तूंच्या विशेष गुणधर्मात होणारे बदल शोधणे, त्यांचा होत

जाणारा विकास समजून घेणे.

३. प्रदर्शनातील वस्तूंचे गुणधर्म शोधणे व त्यांचे वर्गीकरण करणे.

४. इतिहासाच्या मोठ्या कालखंडाचे संकलन करण्याचे कौशल्य शिकणे.

कोरोना *लॉकडाऊन* सुरू झाला आणि युरोपमधील एक बातमी वाचनात आली की, एका संग्रहालयाच्या *क्युरेटरने लॉकडाऊन* असला तरी 'माझे संग्रहालय पाहायला अभ्यागत यायलाच हवेत,' या ईर्षेने रात्रंदिवस खपून संग्रहालयाचे *डिजीटायझेशन* केले. ही बातमी वाचल्यापासून अशा *व्हर्चुअल* संग्रहालय भेटीचे नियोजन कसे करता येईल याबद्दल विचार चालू आहे. या संचारबंदीच्या काळात मी काही *व्हर्चुअल* संग्रहालयांना भेटी दिल्या. त्यानुसार राजा दिनकर केळकर संग्रहालयाला *व्हर्चुअल* भेट देण्यासाठी कसे नियोजन करायला लागेल ते पाहूया.

पूर्व तयारी –

१. दिनकर केळकर यांचे चरित्र समजून घेणे.
२. एखादी कलाकृती कशी बघायची असते, त्यातील तपशील कसे नोंदवायचे असतात, हे माहीत करून घेणे.
३. महाराष्ट्राच्या इतिहासाची कालरेषा तयार करणे.
४. *व्हर्चुअल* भेटीच्यावेळी करायच्या नोंदींची नोंदपत्रके तयार करणे.

प्रत्यक्ष भेटीच्या वेळी –

१. राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या *वेबसाईटला* भेट द्या आणि कार्यपत्रिकेत नोंदी करा. (१५मि.) https://rajakelkarmuseum.org/
२. पुणे येथील राजा दिनकर केळकर संग्रहालय ३डीमध्ये पाहण्यासाठी लेखाच्या शेवटी दिलेला QR कोड स्कॅन करा आणि २० मिनिटे संग्रहालयातून फेरफटका मारून या.
३. संग्रहालयाची वैशिष्ट्ये नोंदवा.
४. तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही दोन कलाकृतींबद्दल दिलेल्या आराखड्यानुसार नोंदी करा. (२०मि.)
(नमुना कार्यपत्रक लेखाच्या शेवटी दिले आहे.)
५. चला, केळकर संग्रहालयातील खजिना शोधूया, खजिनाशोध खेळ (२०मि.)

***व्हर्चुअल* भेटी नंतर :**

१. *व्हर्चुअल टूर ऑडीओ-व्हीजुअल गाईड* तयार करा.
२. राजा केळकर संग्रहालय भेटीबद्दल ब्लॉग लिहा/विकिपिडीयावरील माहिती अद्ययावत करा.

नमुना कार्यपत्रक

चला कलाकृतीचे निरीक्षण करूया

१. कलाकृतीचे नाव.
२. कलाकृतीचे रेखाटन काढा.
३. कलाकृतीचे पाच ओळीत वर्णन करा.
४. कलाकृती कशापासून बनवलेली आहे?
५. संग्रहालयातील अजून कोणत्या कलाकृती या प्रकारच्या आहेत.
६. याप्रकारची वस्तू तुम्ही आजूबाजूला रोजच्या वापरात बघितली आहे का? तुम्ही बघितलेली वस्तू आणि कलाकृती यात काय साम्यफरक आहे, तो नोंदवा.
७. कलाकृतीबद्दल माहिती सांगणारा जो तक्ता संग्रहालयाने लावला आहे त्यातील कोणते तपशील महत्त्वाचे वाटतात?
८. ही कलाकृती तुम्हाला का महत्त्वाची वाटते?

– प्रशांत दिवेकर
विभाग प्रमुख – शैक्षणिक उपक्रम संशोधिका,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030

पाहा
राजा दिनकर केळकर संग्रहालय ३डी

गांधी शांतता पारितोषिक प्राप्त : २०१९ – काबूस बिन सैद अल सैद – ओमानमध्ये प्रस्थापित केलेल्या कायदा व सुव्यवस्थेसाठी

वार्षिक देणगीदार – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे • श्री. अनंत बेडेकर, वाई, जि. सातारा

खास कुमारांसाठी
छात्र प्रबोधनतर्फे ३ दिवाळी अंक!

आजच नोंदणी करा! स्वत:साठी व भावंडांसाठीही! आपल्या मित्र-मैत्रिणींनाही सांगा!!

- **दरवर्षी प्रमाणे यंदाही छात्र प्रबोधनतर्फे कुमारांसाठी तीन दिवाळी विशेषांकांचे प्रकाशन होणार आहे!**
- **प्रत्येक दिवाळी अंक वेगळा! आशय वेगळा, रचना वेगळी!!** • **प्रत्येक अंकाची छापील आवृत्ती व त्याचीच इ–आवृत्तीही प्रकाशित होणार! व त्याच किंमतीत उपलब्ध!** (छापील आवृत्ती पाठवण्याचा खर्च वेगळा, इ –आवृत्ती पाठवण्याचा खर्च नाही.) • **दिवाळी अंकातील अनेक लेखांना जोडणाऱ्या QR कोडमुळे एकाच अंकात दोन अंकांचे साहित्य वाचायला/ ऐकायला मिळणार!!!** • **कृतीला चालना देणारी आकर्षक, कल्पक भेट.**

या विशेषांकांत दडलंय काय!

नित्य दिवाळी अंक

मूळ किंमत ₹ ८०/–, सवलत मूल्य – ₹ ५०/– (सवलत १० ऑक्टोबरपर्यंत लागू)

* उत्कंठा वाढवणाऱ्या, कुतूहल जागृत करणाऱ्या कुमारांच्या भावविश्वाशी जवळीक साधणाऱ्या भावकथा, विज्ञानकथा, सामाजिक आशयाच्या कथा, शब्दांच्या उगमकथा! * साहसवीरांचे अनुभवपर लेख, अंतर्मुख करणारे चिंतनपर लेख, निसर्गपर ललित लेख! * निसर्गपर, सण-उत्सवपर, भावपर आशयसमृद्ध कविता * विज्ञान- तंत्रज्ञान, सद्य घडामोडींवर आधारित माहितीपर लेख * व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठी प्रेरणादायी लेख * **विशेष लेख - 'समाजभान जपणारी युवशक्ती'** * याशिवाय - कलाकृती, विज्ञानप्रयोग, शब्दखेळ, कोडी, विनोद, भाषेच्या गंमतीजमती आणि बरंच काही...

मान्यवर लेखक : मल्हार अरणकल्ले, प्रवीण दवणे, क्षितिज देसाई, रेणू दांडेकर, आश्लेषा महाजन, डॉ. नीलिमा गुंडी, इ.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी – सुबोध दिवाळी अंक

मूळ किंमत ₹ ५०/–, सवलत मूल्य ₹ ३०/– (सवलत १० ऑक्टोबरपर्यंत लागू)

* ग्रामीण जीवनशैली, कुमारांच्या भावविश्वाशी निगडित कथा * भाषेची गोडी वाढवणारे, हृदयस्पर्शी अनुभवपर ललित लेख * आशयघन भावकविता, निसर्गकविता * व्यक्तिमत्त्व विकसनपर, कला, क्रीडा, माहितीपर, प्रेरणादायी लेख * याशिवाय - कलाकृती, विज्ञानप्रयोग, शब्दखेळ, कोडी असं बरंच काही...

मान्यवर लेखक – सुमन नवलकर, ऐश्वर्य पाटेकर, दुर्गेश सोनार, डॉ. कांचनगंगा गंधे, डॉ. मिलिंद ढमढेरे इ.

Specially for English Readers - English Diwali Issue

Original Price : ₹ 80/- Concessional Price : ₹ 50/- (Book Before 10th October)

* Fascinating **Science Fiction**, Classic, exciting, inspirational **Stories** * Lively and joyous **Poems** * Treasure-house of **Informatives** and **Narratives** * **Students' Sharing** * Articles on **Personality Development** * **Hands On Activities,** Puzzles, Craft, riddles & Many More

दिवाळी अंक नोंदणीसाठी

jpprakashane.org या साइटवरून पैसे भरून दिवाळी अंकांची नोंदणी करा. छापील अंक घरपोच मिळण्यासाठी जादाची रक्कम भरावी लागेल... (तपशील साइटवर!)

सर्व सभासदांसाठी विशेष सूचना

* आपल्या वर्गणीतला छापील दिवाळी अंक घरपोच मिळण्यासाठी सभासदांनी ₹ ५०/– १० ऑक्टोबर २०२१ पूर्वी छात्र प्रबोधनकडे पाठवावेत. ज्यांनी jpprakashane.org वरून वर्गणी भरली आहे किंवा ज्यांनी आधीच वर्गणी व्यतिरिक्त वितरणासाठी जादाचे पैसे पाठवले आहेत, त्यांनी परत पैसे भरू नयेत. * सभासदांना छापील अंकाऐवजी इ–दिवाळी अंक हवा असल्यास त्यांनी आपले नाव, इ–मेल व मोबाइल क्रमांक पुढील मोबाइल क्रमांकावर पाठवावा – 8087261517

हात राहावे कामात, वृत्ती आळशी नसावी। विद्यावंत झालो तरी, श्रमांची तयारी असावी।।

वार्षिक देणगीदार – • सौ. उषा पुरंदरे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

हसा... हसा...

• परदेशातून आलेला एक साहेब सांगत होता, 'अहो, इस्राईलमध्ये काय अफाट शेती. केवढं अचाट पीक.'' त्यावर एक शेतकरी म्हणाला, ''अहो, माझ्या कोल्हापूरच्या मित्राची शेती पाहायला गेलो होतो. ट्रॅक्टरवरून फेरफटका मारला. जाता जाता बिया पेरत गेलो. एवढी अफाट शेती. परत येईपर्यंत पीक तयार झालं होतं. मग कापूनच आलो.''

☺

• **शिक्षक** : काय झालं तुला. एवढा चिंतेत का? कसला त्रास होतोय?

विद्यार्थी : हृदयविकार आणि श्वासोच्छ्वास

शिक्षक : एवढ्या लहान वयात असला आजार?

विद्यार्थी : आजार नाही. ते शब्द लिहायचे कसे, याची चिंता पडलीये मला.

☺ ☺ ☺

• इतिहासाच्या तासाला एक मुलगा चक्क झोपला होता. शिक्षक त्याला हलवून म्हणाले, ''अरे केव्हापासून झोपला आहेस?'' डोळे चोळीत विद्यार्थी म्हणाला, ''सर तुम्ही १६ व्या शतकात होता तेव्हापासून.''

☺ ☺ ☺

बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक !

ऑगस्ट २०२१ च्या मासिकांमधील लेख

१. **ऋग्वेद :** दादाची शाळा – स्वाती माने

२. **वयम :** गिंको – डॉ. निर्मोही फडके

३. **निर्मळ रानवारा :** पेंटिंग – शुभा सोहोनी

४. **मुलांचे मासिक :** गोंद्या आला रे – सुरेश परुळेकर

५. **छात्र प्रबोधन :** हॅप्पीवाला बर्थ-डे – अनादि अनंत

(या अंकात दिसणाऱ्या QR कोडवर क्लिक करून तुम्हाला त्यासोबत जोडलेली लिंक पाहाता येईल.)

६. **किशोर :** बेचाळिसच्या लढ्यातील रणरागिणी – प्रशांत सरुडकर

प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २१/१२)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ ऑक्टोबर २०२१ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा –

१) 'झाले मोकळे आकाश' या कथेतील सागरच्या आयुष्याला कुठल्या दोन प्रसंगांनी कलाटणी मिळाली?

२) 'ऋतू हिरवा' या कवितेत नव्या उषेचे स्वागत करायला कोण उत्सुक आहे?

३) 'नीलगायी दिसल्या नाहीत पण...' या लेखात कोणत्या अभयारण्याचा उल्लेख आला आहे?

४) 'राणी रामपाल' या हॉकीपटूची कोणती स्वभाववैशिष्ट्ये तुम्हाला भावली? का?

५) 'आपला हात जगन्नाथ' या नाट्यछटेत हातासंबंधी आलेले किमान तीन वाक्प्रचार लिहा.

सौर श्रावणची 'प्रतिसादी वाचकवीर व्हा!' प्रश्नावली सोडवून छात्र प्रबोधनकडे पाठवणाऱ्या विद्यार्थ्यांचे **हार्दिक अभिनंदन!**

कु. आद्या कुलकर्णी, इ. ७ वी, पुणे **कु. सीमा सावंत (इ. ११ वी), ओरस, जि. सिंधुदुर्ग**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९४३, १ सप्टेंबर २०२१ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

यह मासिक पत्रिका ज्ञान प्रबोधिनी संस्था के स्वामित्व में है। मासिक के मुद्रक, प्रकाशक और संपादक श्री. महेन्द्र सेठिया इन्होंने यह मासिक राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९४३ तथा १ सितंबर २०२१ इस दिनांक पर प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ यहाँ मुद्रण कर के ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० से प्रकाशित की है।

जीवन कणाकणाने घडे

विद्यालय हे सगळे त्रिभुवन विद्यार्थीपण हे आजीवन
त्यास न पुस्तक शिक्षक पदवी स्वयंश्रमाने सारे शिक्षण
ग्रंथान्तरिचे ज्ञानामृत जर जगण्या अपुरे पडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे
जीवन कणाकणाने घडे ।।धृ.।।

निश्चित समयी घडेल निश्चित, नियत ठिकाणी वस्तु सापडत
स्थलकालाचा असा भरवसा ज्याच्यायोगे होई अवगत
वळण असे जो देइल मजला तो सद्‌गुरु सापडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे ।।१।।

परपस्परांशी घेइल जमवुन मना गवसणी मृदमधु बोलुन
उदंड वाचन मार्मिक लेखन जना जोडण्या करि आवाहन
कौशल्यांची अशा शिकवणी अवचित पदरी पडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे ।।२।।

मनीं कणव अन् शरीर सक्षम, सेवाभावी तसा युद्धरत
प्रतिभेचा जणु निर्झर वाहत, निर्धारे व्रत करी अखंडित
निर्भय हसरा लोकजयिष्णू संकटास जो भिडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे ।।३।।

– राम डिंबळे

या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

पद्याचा भावार्थ : केवळ पुस्तकी शिक्षण, मिळवलेल्या पदव्या यामुळे व्यक्तिमत्त्व घडत नसते. तर त्याला डोळसपणे घेतलेल्या अनुभवांची, स्वयंअध्ययनाची जोड दिली तर शिकण्याची क्रिया आयुष्यभर चालू राहते आणि जीवनाला आकार येतो; ही शिक्षणाची मूलभूत संकल्पना प्रस्तुत पद्यात मांडली आहे.

केवळ पुस्तकी शिक्षण हे जीवन सार्थ करण्यासाठी पुरेसे नसते. भरपूर वाचन, लेखन यातून तर अध्ययन करूयाच; पण जगात सभोवताली घडणाऱ्या घटना, प्रसंगी परिस्थितीशी करावा लागणारा संघर्ष यातून शिकत गेलो, तर हळूहळू आपल्या जीवनाला कणाकणाने आकार येतो.

अनुभवातून शिकत, योग्य नियोजन व्यवस्थितपणे केले तर आपले नियोजित कार्य योग्य ठिकाणी, योग्य वेळी पूर्ण होऊ शकते, हे शिकवणारा सद्‌गुरू केवळ शाळा-महाविद्यालयातच नव्हे; तर जगाच्या बिनभिंतींच्या उघड्या शाळेतही भेटला तर आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण जगायला योग्य अशी नक्कीच होईल.

मनाची संवेदनशीलता, सहानुभाव जपणारा, शरीर बळकट करून प्रसंगी दोन हात करण्याची तयारी असणारा, सदैव सेवाभावाचे व्रत जपणारा, मनाचा निर्धार असणारा, निर्भय, प्रसन्न, नवनवीन कल्पना सुचणारा असा अनंतकालचा विद्यार्थी बनणे ही भूमिका असेल, तर शिक्षणाचा खरा अर्थ आपल्याला कळला असे होईल.

जीवनसंघर्षाला तोंड न देऊ शकल्यामुळे वैफल्यग्रस्त होणाऱ्या आजच्या विद्यार्थ्यांसाठी, तर हे पद्य खूपच अंतर्मुख करणारे व प्रेरणा देणारे आहे.

सौर भाद्रपद, शके १९४३/सप्टेंबर २०२१ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० भाद्रपद, शके १९४३/१ सप्टेंबर २०२१
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-9-2021

कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र....!
– चि. आर्य आघोर (इ. ८ वी), पुणे

सौर दिनदर्शिका शके १९४३

	सप्टेंबर २०२१	भाद्रपद आश्विन
बु.	1	भा.१०
गु.	2	११
शु.	3	१२
श.	4	१३
र.	5	१४
सो.	6	१५
मं.	7	१६
बु.	8	१७
गु.	9	१८
शु.	10	१९
श.	11	२०
र.	12	२१
सो.	13	२२
मं.	14	२३
बु.	15	२४
गु.	16	२५
शु.	17	२६
श.	18	२७
र.	19	२८
सो.	20	२९
मं.	21	३०
बु.	22	३१
गु.	23	आ.१
शु.	24	२
श.	25	३
र.	26	४
सो.	27	५
मं.	28	६
बु.	29	७
गु.	30	८

सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल.

सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
इ–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०
वार्षिक वर्गणी : ₹ २००

प्रिय पोस्टमन,

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन